# दोन

## बाबा पदमनजींची साहित्य निर्मिती

## दोन

## बाबा पदमनजी यांची साहित्यनिर्मिती

### साहित्यनिर्मिती आणि इंग्रजांचे शिक्षण विषायक धोरण

इंग्रजांच्या राजवटीमुळे पाश्चात्य संस्कृतिचा इथल्या जनजीवनाशी निकटचा संबंध आला. आणि एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीच येथील

परमार्थप्रवण, आदर्शवादी, पारंपारिक अशा साहित्यविषयक भूमिकेत ऐहिक, उपयुक्ततावादी आणि विज्ञानोन्मुख घटक मिसळले.

या कालखंडातील वाङ्.मयविषयक भूमिका समजून घेण्यास सर्वात उपयुक्त ठरणारे साधन म्हणजे इंग्रज सरकारचे शिक्षण विषयक धोरण होय. कारण अव्वल इंग्रजी काळातील ग्रंथनिर्मिती ही सरकारच्या शिक्षण-विषयक धोरणाचाच परिपाक आहे. इंग्रजी शिक्षणपध्दति अंमलात आल्यानंतर संस्कृतीचा एक नवा मनु देशात व पर्यायाने महाराष्ट्रातही सुरू झाला. त्यामुळे मराठी भाषा आणि साहित्य यांचे रूप अंतर्बाह्य बदलून गेले. इंग्रजांचे प्रारंभीचे शिक्षणविषयक धोरण उदारमतवादी असल्यामुळे पाश्चात्य विद्यांचे शिक्षण देशी भाषांमधून दिले जावे, असा निर्णय सरकारने घेतला. त्यामुळे समाजाच्या सर्व थरांत शिक्षणाचा प्रसार होण्यास मदत झाली. सरकारने शालोपयोगी पुस्तके तयार केली. खासगी क्षेत्रात होणाऱ्या ग्रंथनिर्मितीच्या प्रयत्नांनाही सरकारने सहाय्य दिले. या सर्वांमुळे सुशिक्षितांचा, विचारवंतांचा एक वर्ग समाजात उदयाला आला. ही घटना सांस्कृतिक परिवर्तनाच्यादृष्टीने महत्वाची होती.

नव्या राजवटीत व्यवहारोपयोगी विद्यांना महत्व मिळाले. त्या गरजेतून नवे गद्य घडले. त्यामुळे हे गद्य पूर्वपरंपरेपेक्षा वेगळे होते. ते बाळबोध,

अलंकाररहित असल्याने प्रचलित गद्याला साधे व नेटके वळण मिळून मराठीची एक वेगळी व अभिनव गद्यशैली रूढ झाली. त्या काळाच्या नियतकालिकांतून ज्ञानप्रसार, मतप्रकटन आणि विचारजागृतीस महत्त्व असल्यामुळे त्यांचे स्वरूपही सुंदर गद्यशैली रूळविण्यास पूरक ठरले. इंग्रजी राजवटीचा काळ भावनेपेक्षा विचारावर, आध्यात्मिक चर्चेपेक्षा भौतिक घडामोडींवर भर देणारा होता. यामुळेच इतिहास, भूगोल, ऐहिक सुखाची महती, सामाजिक-धार्मिक स्थ:स्थितीचा विचार या गोष्टींना विशेष महत्त्व आले व याचाच आविष्कार वाड्.मयातून झाला. या काळात वाड्.मयाचे स्वतंत्र अस्तित्व मान्य झाल्यासारखे दिसत असले तरी त्याचे साधन-रूपच सर्वमान्य होते. उपयुक्ततेच्या महतीमुळे वाड्.मयाचा वापर बोध व प्रचार यासाठीच मुख्यत: होत होता.

## साहित्यविषयक भूमिकेतील `नवता`

आपला समाज आध्यात्माकडून भौतिकाकडे, पारलौकिकाकडून इहलोकाकडे, अंधश्रध्देकडून विवेकाकडे वळला. समाजाच्या मानसिकतेमधील या परिवर्तनामुळे व्यक्तिवादी विचारसरणी, अस्मिता जागृती या गोष्टी उत्पन्न झाल्या. त्यामुळेच व्यक्तीच्या अविष्कारास स्वातंत्र्य लाभले.

बाळशास्त्री जांभेकर, विष्णुबुवा ब्रम्हचारी, जोतीराव फुले, लोकहितवादी यांनी समाज व धर्मसुधारणेच्या भूमिकेतून विचार जागृती केली. सामाजिक आणि धार्मिक प्रगतीच्या दिशेने प्रबोधनाची प्रक्रिया सुरू होते तेव्हा भाषा, साहित्य, कला याविषयीच्या नव्या जाणिवाही निर्माण होतात. यामधूनच नवी कलादृष्टी, साहित्यविषयक भूमिका प्राप्त होत असते. निबंध-मालोत्तर काळात अर्वाचीन मराठी वाड्.मयाचे सुवर्णयुग अवतरले असले तरी त्याची पूर्वतयारी याच काळात झाली.

इंग्रजी आमदानीतील पहिल्या अर्धशतकाचा काळ हा पाश्चात्य मूल्यांच्या अनुकरणाचा होता असे सामान्यपणे म्हणता येईल. त्यामुळेच

पारमार्थिक कल्याणासाठी वाङ्‌मयनिर्मिती ही भूमिका मागे पडली व ऐहिक अभ्युदयासाठी लेखन होऊ लागले. यामुळे ऐहिक प्रवृत्तीचा व जातिधर्मनिरपेक्ष असा नवा वाचकवर्ग निर्माण झाला. हा वाचकवर्ग जेव्हा संख्येने वाढला तेव्हा त्याची वाचनभूक भागविण्यासाठी, आणि त्याच्या रंजनात्मक प्रवृत्तींना खाद्य पुरविण्यासाठी कथात्मक वाङ्‌मय घडू लागले. लक्ष्मणशास्त्री हळबे, ना.स. रिसबूड यांच्या अद्‌भुतरम्य, अचाट कथानकाच्या कादंबऱ्या लोकप्रिय झाल्या. या कादंबऱ्यांची भाषाशैली प्रौढ व संस्कृतप्रचुर होती. रसपरिपोष आणि संस्कृतप्रचुर अलंकारिक रचना यांचे घनिष्ठ संबंध मानण्याच्या कल्पनेतून अशी भाषा वापरली गेली. म्हणूनच 'रत्नप्रभा' या कादंबरीच्या परिक्षणाच्या निमित्ताने का.बा. मराठे यांनी अशा कादंबऱ्यातील आशयाचा अतिरेकीपणा व अद्‌भुत-रम्यतेवर, तसेच अभिव्यक्तीच्या कृत्रिमतेवर आक्षेप घेतले. आणि कादंबऱ्यात वास्तवाची आवश्यकता मांडली.

संस्कृतप्रचुर अलंकारिक रचनेमुळे ललित गद्याच्या भाषेत कृत्रिमतेचे स्तोम माजले होते. अशा काळात पद्याच्या भाषेत वास्तव स्वरूपाचा बदल घडविण्याची म.मो. कुंटे यांची इच्छा व हिंमत क्रांतिकारक मानायला हवी. वाङ्‌मयविषयक नव्या अभिरूचिचा व जाणिवांचा तीव्र आविष्कार त्यांच्या 'राजा शिवाजी' या काव्याच्या प्रस्तावनेत आढळतो.

या सांस्कृतिक परिवर्तनामधून कथा, कादंबरी, काव्य, नाटक, निबंध, चरित्र, आत्मचरित्र या साहित्यप्रांतात लेखन सुरू झाले. कोश व व्याकरणग्रंथ निर्माण झाले. यामधून भाषा व साहित्य यांच्याबद्दलच्या नव्या जाणिवा उदयाला आल्या.

## बाबा पदमनजींच्या लेखनाविष्काराचे वेगळेपण

सांस्कृतिक परिवर्तनातून जी जागृती घडली तिच्या अनेक बाजू होत्या. या जागृतिच्या एका टोकाला स्वधर्माचा हिरिरीने पुरस्कार करणारे विष्णुबुवा

ब्रम्हचारी आढळतात तर दुसऱ्या टोकाला ख्रिस्ती धर्माचा अंगिकार केलेले बाबा पदमनजी. स्वत:ला पटलेला नवा धर्मविचार बाबांनी सातत्याने आयुष्यभर विशद केला. या काळातील बाबांसह इतर अनेकजणांचे लेखन उपदेश आणि मतप्रचारापासून मुक्त नव्हते. अनेक संस्थांच्या पूर्वनिश्चित धोरणातून आखलेल्या स्पर्धांसाठी बरेचजण लिहित होते. बाबांचीही कांही ग्रंथरचना यामधून निर्माण झाली आहे.

बाबांच्याकडे तत्कालीन समाजाने ' बाट्या ' म्हणून पाहिले. त्यामुळे त्यांच्या काही पुस्तकांतील १ विचार धर्मप्रचारापासून मुक्त आणि सामाजिक सुधारणेला, नैतिक विकासाला पोषाक असले तरी समाजाने त्यांकडे लक्षापूर्वक दुर्लक्ष केले आणि या विचारवंताच्या पदरी उपेक्षेचे दान पडले.

एकोणिसाव्या शतकातील मोठ्या ग्रंथकारांमध्ये बाबांची गणना होत असली तरी त्यांच्यामध्ये ते अनेकप्रकारे व अनेकदृष्टीनी वेगळे पडतात. नव्या समाजघडणीच्यादृष्टीने ग्रंथसतेचे कालोचित महत्व ओळखून त्यांनी सातत्याने ग्रंथनिर्मिती केली आहे. परंतु ती ख्रिस्ती धर्मप्रणित पारमार्थिक उध्दाराच्या तळमळीपोटी झाली आहे. कोशग्रंथाच्या रचनेमधून स्वमतप्रचाराला वाव नसतो, असे सामान्यत: मानण्यात येते. पण ' इंग्रजी-मराठी ' कोशाच्या प्रस्तावनेत बाबा असे म्हणतात ' ज्यात अक्षय जीवनाचे शब्द आहेत असे जे पवित्र शास्त्र त्याचा या देशात प्रसार होण्यास हा लहानसा ग्रंथ कारणीभूत होवो '. यावरून लेखणी हाती धरण्यामागील बाबांच्या निष्ठ प्रकट होतात. या निष्ठांमुळे त्यांच्या अवलोकन दृष्टीवर काही मर्यादाही पडल्या आहेत. याची जाणीव ठेवून त्यांच्या विविधस्वरूपी लेखनकर्तृत्वाचा परामर्श घेणे गरजेचे आहे.

बाबांची संपादकीय कामगिरी

लोकशिक्षणाबरोबर समाजात वैचारिक क्रांती घडविण्याचे, राष्ट्रात नवचैतन्य निर्माण करण्याचे, वाङ्मयात नवे युग आणण्याचे काम या काळातील नियतकालिकांनी केले. नियतकालिकांतून येणाऱ्या लेखांमधून व त्यातून अवतरलेल्या

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR
SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

निबंधामधून प्रामुख्याने सामाजिक व धर्मविचारात कांही सुधारणा हवी असे विचार मांडले जाऊ लागले. धर्मकल्पनेने साऱ्या समाजजीवनाला व्यापिले होते अशा काळात हे अपरिहार्य होते. बाबा पदमनजींनीही ख्रिस्ती धर्माची महती पटवून देण्याच्या भूमिकेतून नियतकालिकाचे संपादन केले. स्वमत प्रचारासाठी एखादे नियतकालिक हाताशी असणे ही त्या प्रबोधन युगातील बाबांसारख्या कर्त्या पुरुषाची गरजच होती.

इ.स. १८५६ मध्ये त्यांनी `उदयप्रभा` हे मासिक पत्र सुरू केले. घेणाऱ्यास सुलभ व्हावे म्हणून अल्प किंमत, सुबोध भाषा, बायबल व ख्रिस्ती वाङ्मयातील उत्तमोत्तम उतारे छापण्याचा परिपाठ या `उदयप्रभे`च्या वैशिष्ट्यांचा उल्लेख `ज्ञानोदया`ने[२] केला आहे. हे पत्र बंद पडल्यानंतर त्यांनी `प्रमोदय` सुरू केले. ज्ञान, मनोरंजन आणि लोकहित यांचा त्रिवेणी संगम यात झाला होता. लोकहिताची नवी वृत्ते छापणे, काही रंजक रोचक माहिती प्रसिध्द करणे हे या नियतकालिकाचे ध्येयधोरण होते. संपादकाजवळ लोकस्थितीचे निरिक्षण व लोकमताच्या अभ्यासाची कुवत असावी लागते. ती बाबांच्या ठिकाणी होती म्हणूनच `ज्ञानोदया`ने `प्रमोदया`तील वृत्तांना पुन:प्रसिध्दी देऊन जणू बाबांच्या संपादकीय कर्तृत्वाचा गौरव केला आहे.

मुलांवर संस्कार करण्यासाठी त्यांनी इ.स.१८६१ मध्ये `सत्यदीपिका` (धाकटी) हे मासिक पत्र सुरू केले. लहानमोठ्या कथा, कविता, अल्प निबंध, शास्त्रीय लेख, आश्चर्यकारक माहिती देणारी सदरे, म्हणी, सुभाषिते, उखाणे इत्यादी भरगच्च मजकूर यामध्ये असे विद्यार्थ्यांचे मनोरंजन करीत असता त्यांच्या पदरात ज्ञानाचे माप टाकण्याचा बाबांचा उद्देश होता. वर्षातील ठळक घटनाही वर्षा अखेरी एकत्रितपणे देण्याची प्रथा बाबांनी सुरू केली होती. बाबा जातिवंत शिक्षक होते म्हणूनच मुलांना वाचनासाठी उद्युक्त करणे, त्यांना अभिरुचिसंपन्न करून त्यांचे सामान्यज्ञान वाढविणे ही उद्दिष्टे साध्य करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. हे नियतकालिक सातत्याने तेरा वर्षे चालविल्या-

नंतर आर्थिक अडचणीपोटी त्यांना बंद करावे लागले.

धाकट्या 'सत्यदीपिके'च्या शेवटच्या अंकातच त्यांनी थोरल्या 'सत्यदीपिके'ची कल्पना जाहीर केली. स्वतंत्र विचारांचे, प्रौढ वाचकांना उद्बोधक ठरावे असे व छापखाना व टपालाचा खर्च भागविण्याइतकी माफक किंमत असणारे - अशी या नियतकालिकाची वैशिष्ट्ये होती.

पुढे इ.स.१८८४ मध्ये बाबांनी 'कुटुंबमित्र' हे मासिक पुस्तक सुरू केले. मासिक पुस्तकाचा प्रसार व्हावा व मराठी वाचकांस ख्रिस्ती धर्मविषायक नाना विषयांचे ज्ञान व्हावे ही या नियतकालिकाच्या निर्मिती मागील धोरणे होती. या नंतरच्या काळात त्यांनी 'सत्यवादी', ऐक्यदर्शक पत्रिका' ही नियतकालिके चालविली.

त्यांनी चालविलेल्या काही नियतकालिकांना सार्वजनिक संस्थांची मदत होती, तर काही त्यांनी स्वत: झीज सोसून प्रसंगी कर्ज काढूनसुध्दा चालविली होती. त्यांच्या संपादकीय कामगिरीमागील साक्षेप दांडगा होता. बिकट आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना नियतकालिके बंद करावी लागली तरी बाबांच्यामधील संपादक प्रतिकूल परिस्थितीपुढे हार जात नसे. एक बंद पडले तरी पुन्हा नवे नियतकालिक सुरू करणे, त्याद्वारे नवनवे प्रयोग करणे, नव्या कल्पना आकाराला आणणे, ही बाबांची वृत्ती होती.

## 'निबंधकार' बाबा पदमनजी

मराठी गद्याला पद्याप्रमाणे अखंड वाङ्मयीन परंपरा नसल्यामुळे आंग्ल-काळातील त्याचे प्रारंभीचे वळण बालबोध होते. पूर्वकालीन गद्यातील त्रुटितता, आडंबर, कृत्रिमता, अपूर्ण अर्थव्यक्ती व दूरान्वय हे दोन अव्वल इंग्रज काळातील गद्यलेखनात होते. परंतु कालांतराने ते नाहीसे होऊन सफाईदार अभिनव गद्यशैली अस्तित्वात आली.[3] तिची जडणघडण करण्यात लोकहितवादी व बाबा पदमनजी

या दोघा निबंधकारांनी मोठाच हातभार लावला.

इ.स.१८५१ च्या सुमारास बाबांनी काही विषयावर स्वतंत्रपणे लेखन करून, त्या लेखांचा संग्रह `निबंधमाला` या नावाने प्रसिध्द केला. पुढे फ्रीचर्च विद्यालयात नोकरी करीत असताना ट्रॅक्ट सोसायटीच्या अटीप्रमाणे त्यांनी `हिंदू लोकांच्या सणांविषयी निबंध` तयार केला. त्याबद्दल त्यांना शंभर रूपयांचे बक्षिसही मिळाले. `ज्या सणांपासून जे लाभ किंवा हानी होतात ह्याविषयी आजपर्यंन्त हिंदू लोकांमध्ये कोणी शोध केला नाही.` म्हणून बाबा याविषयावर लिहिण्यास प्रवृत्त झाले. ज्या सणांपासून ऋण व दारिद्र्य घरात शिरते व ज्यापासून शरिरास दु:ख होते तो सण पाळू नये व जो सण ईश्वर स्थापित आहे, ज्यापासून ईश्वराचे गौरव दृष्टीस पडते तो पाळावा असे प्रतिपादन त्यांनी या निबंधात केले आहे. राष्ट्रीय सणांबद्दलची बाबांची भूमिका त्यांची दूरदृष्टी स्पष्ट करणारी आहे. बाबा म्हणतात, `या निबंध कर्त्यास असे वाटते की या देशात जेव्हा परोपकाराची, दयेची, देशकल्याणाची, विद्यावृध्दीची व सध्दर्मप्रसाराची मोठमोठाली कामे होऊ लागतील, ते पुढे सण होऊन बसतील.`

`स्त्रीविद्याभ्यास निबंधा`त त्यांनी सांगितले आहे की, स्त्रियांस विद्या शिकवून त्यांच्या योग्यतेप्रमाणे मान देणे व त्यांच्या कल्याणाची इच्छा बाळगणे याला हिंदूंचा विरोध आहे. या अनर्थपरंपरेने हिंदूचे किती नुकसान झाले त्याचे विवेचन बाबांनी काहीशा अतिशयोक्तीने केले आहे. तसेच स्त्रीशिक्षणामुळे होणाऱ्या फायद्याचे चित्रणही अतिरेकीपणाने केले आहे.` स्त्रीशिक्षणाबाबत विरोधकांनी जितक्या अतिरंजिततेने धोके कल्पिले आहेत तितक्याच एकांतिक धोरणाने बाबांनी शिक्षणापासून होणाऱ्या लाभांचे चित्र काढले आहे,' असे मार्मिक भाष्य गो.मा. रानडे [4] यानी केले आहे.

ई.स.१८५४ मध्ये बाबांनी `व्यभिचारनिषेधक बोध` हा निबंध लिहिला. कलावंतिणीच्या नाचाच्या प्रथेविरूध्द लिहावे ही त्यांची मूळ कल्पना,

पण नंतर विषय व्यापक व गुंतागुंतीचा होत गेला. या निबंधाच्या पहिल्या भागात व्यभिचाराचे प्रकार, त्याविषयीचे लोकांचे मत व दुसऱ्या भागात व्यभिचार बंद करण्याचे सद्गृहस्थांनी जे प्रयत्न केले, त्याबद्दल विवेचन आहे.

`कुटुंबाची सुधारणा` या निबंधाला दक्षिणा प्राईज कमिटीचे बक्षिस मिळाले होते. या निबंधातून व्यक्त झालेल्या त्यांच्या जीवनविषयक दृष्टीकोणावर ख्रिस्ती धर्ममतांची छाप आहे. तरीही त्यांनी त्याकाळातील स्त्रियांची स्थिती, लग्नपध्दती, पुनर्विवाह, सण समारंभ इ. अनेक विषयावर सुधारणेच्या तळमळीतून भाष्य केल्याचे आढळते. या निबंधातील विषयांची विविधता आणि आशयाची व्यापकता पाहिल्यानंतर `प्रस्तुत ग्रंथाचे नाव कुटुंबाची सुधारणा असे असले तरी त्याचे स्वरूप खरोखरीच समाजाची सुधारणा या शीर्षकाला शोभेल असेच आहे.`[5] असे वाटू लागते.

बाबांनी आपल्या निबंधात प्रामुख्याने धर्म आणि समाजसुधारणाविषयक आशय मांडला आहे. त्यात वैचारिक तपशीलाप्रमाणे भावनिक तळमळही आहे. लोकहितवादींच्या तुलनेने त्यांची शैलीही आकर्षक आहे. ख्रिस्ती लेखकांतील एक संयमित विचारांचा निबंधकार म्हणून बाबांचे स्थान अढळ आहे.

धर्मप्रसारात्मक लेखन

एतद्देशीयांना ख्रिस्ती धर्माची तत्वे समजावून सांगण्यासाठी बहुश: ख्रिस्ती वाङ्मयाची निर्मिती झाली आहे. आध्यात्मिक मोक्षाचा जो मार्ग बाबांना गवसला होता तो इतरांना परोपरीने पटवून देण्यासाठीच बाबांचेही पुष्कळसे ग्रंथ निर्माण झाले आहेत. मायमराठीतून उत्कटतेने लिहिणारे बाबा, अखंड साक्षेपी असे पहिले ख्रिस्तसेवक आहेत.

लंडनमधील ट्रॅक्ट सोसायटीने प्रसिध्द केलेल्या नव्या करारांचा परिचय त्यांनी `नव्या करारांवर टीका` या ग्रंथाद्वारे करून दिला आहे. त्यांच्या

ख्रिस्ती धर्मविषयक चिंतनाचा व व्यासंगाचा परिपाक या ग्रंथात उतरला आहे. बायबलवर आजपर्यन्त प्राचीन भाषा व ऐतिहासिक संदर्भासाठी अनेक टीकाग्रंथ झाले, त्यामध्ये बाबांचा हा ग्रंथ महत्त्वाचा आहे. नव्या कराराचे स्वरूप उलगडून दाखविताना त्यांनी जुन्या कराराची पार्श्वभूमी मांडली आहे. ग्रंथांच्या शेवटी मुख्य विषयांची वर्णानुक्रमणिका देऊन अभ्यासकांची सोय केली आहे.

`येशू ख्रिस्ताचे चरित्र` या ग्रंथाचे लेखन करताना त्यांनी ख्रिस्त चरित्राशी संबंधित अशी अनेक पुस्तके वाचली. त्यामुळे अनेक विपर्यास कमी झाले. तसेच त्यातील दंतकथा व अविश्वसनीय माहिती बाबांनी वेगळी काढली. ग्रंथाच्या शेवटी स्पष्टीकरणात्मक टीपा व दर्शिका देऊन वाचकांची सोय केली आहे.

`शंकानिवृत्ती` (१८५९) हे पुस्तक ट्रॅक्ट स्वरूपाचे आहे. त्यात बाबांनी हिंदू धर्मीयांच्या ख्रिस्तीधर्मविषयक शंकांना उत्तरे दिली आहेत. `ख्रिस्ती लोकांचे कर्तव्यसार` (१८५९) यात संसार, खर्च, मुलांचे शिक्षण याबाबतच्या ख्रिस्ती व्यक्तीच्या कर्तव्यांवर प्रकाश टाकला आहे.

धर्मविवेचन करणारी अशी शंभराहून अधिक पुस्तके बाबांनी लिहिली. ख्रिस्ती धर्मतत्त्वांबद्दलची त्यांची आत्यंतिक निष्ठा व ती तत्त्वे सर्वांपर्यन्त पोहोचविण्याची तळमळ यामधून हे लेखन घडले आहे. या पुस्तकांनी ख्रिस्ती मराठी वाङ्मयात मोलाची भर घातली असली तरी त्यांच्या वाङ्मयीन गुणांबद्दल काही चर्चा करणे मात्र अशक्य आहे.

बाबांच्या कोशरचनेचे महत्त्व

राज्यप्रशासनाच्या सोयीसाठी प्रारंभिक काळात सरकारला मराठी-इंग्रजी व इंग्रजी-मराठी अशा द्वैभाषिक शब्दकोशांची जरूरी होती. त्यामुळे सरकारने कोशरचनेच्या प्रयत्नांना उत्तेजन दिले. यामधून निर्माण झालेल्या मोल्सवर्थ, कँडी यांच्या शब्दकोशाचे संक्षेपीकरण ही काळाची गरज होती.

बाबांनी हे कार्य केले. त्यांच्या शब्दकोशविषयक कार्याची उपयुक्तता काळाच्या कसोटीवर सिध्द झाली आहे.

मोल्सवर्थ-कँडीच्या `इंग्रजी-मराठी` कोशाच्या आधारे पण सामान्य माणसाला पेलेल व परवडेल असा कोश तयार करण्याचे काम त्यांनी दीर्घ परिश्रमाने पुरे केले. हे करीत असतानाच इ.स. १८६० मध्ये `शब्दरत्नावली` या अभिनव स्वरूपाच्या शब्दकोशाची रचना केली. इंग्रजीतील `रॉजेट्स थिसॉरस` च्या धर्तीवर या कोशाची मांडणी आहे. यामध्ये समानार्थी, विरुध्दार्थी, परस्पर-संबंधित शब्द एकत्र सापडतात. या कोशाच्या प्रस्तावनेत बाबा म्हणतात, `कँडीकृत कोशाचा संक्षेप करिताना त्या शब्दसमुद्राच्या संपूर्ण प्रदेशातून पर्यटन करीत जावे लागले. तेव्हा महाराष्ट्र भाषेतील शब्दरूप रत्नांची बेटे जागोजागी आढळली ती पाहून चित्तास बहुत आनंद व आश्चर्य वाटू लागले आणि अशी ही मातबर भाषा आपल्याच लोकांना माहीत नसावी आणि तिचा इंग्लिश लोकांनी शोध करावा व इंग्लीश शिकणाऱ्यांस मात्र तिचा लाभ व्हावा म्हणून दु:खही वाटते ----` या सखेद भावनेतूनच बाबांनी हे शब्दभांडार देशबांधवांसाठी उजेडात आणले. अशाच प्रकारचा मोठा उपक्रम भविष्यकाळात हाती घ्यावा असा त्यांचा मनोदय होता. परंतु या अभिनव प्रयत्नाला पुरेसे उत्तेजन लाभले असते, अशा भाषाविषयक कार्याचे महत्व लोकांना कळले असते तर एक महान प्रकल्प शंभर वर्षांपूर्वीच साकार झाला असता.

मोल्सवर्थच्या कोशाच्या आधारे बाबांनी `मराठी-इंग्रजी` कोश इ.स.१८६३ मध्ये सिध्द केला. मराठीचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांस संस्कृत शब्दांचे अर्थ कळण्याच्यादृष्टीने त्यांनी `संस्कृत-मराठी` कोशाचीही रचना केली.

मराठी गद्याची जडणघडण ज्या काळात होत होती, तेव्हा बाबांनी हे भाषा विषयक कार्य केले आहे. मोल्सवर्थ, कँडी यांच्या कोशाचे संक्षेपीकरण करावे, या हेतूने बाबा जरी या क्षेत्रात उतरले असले तरी कुशाग्र बुध्दीच्या व

कल्पकतेच्या बळावर त्यांनी आपल्या स्वतंत्र कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे. `शब्दरत्नावली` `संस्कृत-मराठी` कोश यासारखी रचना करून त्यांनी अधिक उपयुक्त व मूलभूत स्वरूपाचे कार्य केले आहे. कोश रचनेत तात्त्विक आणि तांत्रिक गोष्टीपेक्षा त्यांनी व्यावहारिक दृष्टी ठेविली होती. म्हणूनच त्यांची शब्दकोशरचना सामान्य जनांनाही उपयोगी ठरली.

`यमुना पर्यटन`

अद्‌भुतरम्य आणि पुराणातील नवलकथांनी गजबजलेल्या काळात इ.स. १८५७ मध्ये प्रसिध्द झालेली, ज्वलंत सामाजिक समस्येकडे निर्देश करणारी बाबांची ही कादंबरी म्हणजे मराठीतील पहिली कादंबरी आहे. १५ नोव्हेंबर १८५६ मध्ये बाबांनी `बॉबे गार्डियन` या नियतकालिकात या कादंबरीची जी प्रसिध्दीपूर्व जाहिरात दिली होती तिला चांगलाच प्रतिसाद मिळाला. सुमारे पांचशे प्रतींची आगाऊ नोंदणी झाली होती.

या कादंबरीतून विधवाविवाहाच्या प्रश्नाकडे बाबा केवळ सामाजिक दृष्टीने पाहात नाहीत. `प्रक्षोभक चित्रणाने समाजाला धक्का द्यावयाचा परंतु केवळ धक्का देऊन थांबावयाचे नाही, तर त्यातून सोडवणूक करून घ्यावयासाठी स्वत:ला पटलेला नवा धर्म मार्ग सुचवायचा असा दुहेरी हेतू या कादंबरीच्या लेखनामागे आहे.`[६]

कथा आणि कादंबरी हे आज जरी दोन स्वतंत्र वाङ्‌मय प्रकार मानले जात असले तरी त्या काळात कादंबरीतून अनेक छोट्या छोट्या कथांची सांधेजोड करण्याची पध्दती होती. विधवा दु:स्थितीच्या अनेक हकीकतींमधून एक सुसंगत कथा मांडण्याचा प्रयत्न बाबांनी केला आहे. त्यांच्यादृष्टीने ही सुसंगती यमुनेच्या ख्रिस्तीधर्म स्वीकारात परिणत होते. त्यांचे हे प्रस्तुत अनुमान कोणाला पटो वा न पटो, `पण त्यात लेखकाचा निश्चित दृष्टीकोण आणि त्याचा अविष्कार

आहे यात शंका नाही. बाबांनी पत्करलेल्या दृष्टिकोणानेच या कथेची व तिच्या रचनेची शैली निश्चित झाली आहे. अनेक विधवांच्या हकीकती प्रथमत: एकत्र करून आणि नंतर स्वत: यमुनेला त्या परिस्थितीतून जावयास लावून बाबांनी एका प्राथमिक पध्दतीने का होईना इष्ट प्रमेयाची मांडणी केली आहे.` ७

या कादंबरीचे प्रमुख वैशिष्टय म्हणजे कथानकाच्या साध्या, सरळ स्वरूपातून अविष्कृत झालेला वास्तववाद होय. `बाबांचा वास्तववाद प्रचाराने डागाळलेला असला, बौध्दिक आवाक्याने उथळ वाटला, आणि त्यात फारशी कल्पकता नसली तरी तो आशयाचा वास्तववाद आहे.` ८

या कादंबरीचे लेखन करताना बाबांची आत्यंतिक धर्मश्रध्दा केवळ व्यावहारिकतेच्या पातळीवर उतरणे शक्यच नव्हते. म्हणूनच बाबांनी विधवांच्या ऐहिक कल्याणाला पारलौकिक सुखाची जोड दिली आहे. म्हणूनच ही कादंबरी म्हणजे त्यांच्या धर्मवेडया मनातून फुललेले एक स्वप्नरंजन आहे. एखादा वाङ्‌मय प्रकारातील पहिली वहिली कृती वादग्रस्त, प्रक्षोभक, सार्वजनिक महत्वाची व समकालीन सामाजिक समस्येचा शोध घेणारी क्वचितच असते. `यमुनापर्यटन` म्हणजे यादृष्टीने एक अपवाद आहे.

बाबांचे आत्मनिवेदनपर लेखन
-----------------------

ज्या काळात आत्मनिवेदनपर लेखनाची प्रकृती मराठीत फारशी रूजलेली नव्हती, त्या काळात बाबांनी अशा स्वरूपाचे लेखन करून एका नव्या दालनाकडे सर्वांचे लक्ष वेधले. त्यांच्या आत्मनिवेदनपर लेखनातून, धर्मजाणिवेवर झालेल्या संस्काराचे सुस्पष्ट चित्र जाणवते. तसेच त्यामधून दिसून येणारे समकालीन वातावरणाचे प्रतिबिंबही मोलाचे आहे. एका सुसंस्कृत, विवेकसंपन्न मनाने अवलोकिलेली वस्तुस्थिती व तिच्याबद्दलच्या उत्कट प्रतिक्रिया यामुळे यामधील समाजचित्रण चैतन्यपूर्ण आणि हृद्य झाले आहे.

`अरुणोदय` या त्यांच्या आत्मचरित्राची सविस्तर चर्चा आपणास इतरत्र करावयाची आहे.

`अनुभवसंग्रह` भाग एक आणि दोन, हे पुस्तक म्हणजे त्यांच्या ख्रिस्ती जिण्याचा आरसा आहे. दैनंदिनीमधील लेखांतून साकारलेल्या या पुस्तकात बाबांनी आजवर अवलोकिलेली ख्रिस्ती धर्मतत्वे, त्यांचा त्यांना आलेला साक्षात्कारी अनुभव तसेच त्यांविषयी केलेले उत्कट चिंतन या गोष्टी समाविष्ट आहेत. पुस्तकाच्या प्रस्तावनेत बाबा या लेखनामागील भूमिका [1] स्पष्ट करताना म्हणतात, `अशा प्रकारचे पुस्तक प्रसिध्द करणे म्हणजे मोठे नाजूक काम होय. आपल्या पारमार्थिक व आत्मिक अनुभवांच्या तपशीलवार गोष्टी जगापुढे आणण्यास कोणी पुढे सरसावत नाहीत. तथापि कित्येकांस लोकहितार्थ असे करणे अवश्य वाटते. पवित्र शास्त्र लिहिणा-यांपैकी दाविद व पौलस यांनी आपल्या अनुभवाच्या गोष्टी जितक्या लिहून ठेविल्या तितक्या दुस-या कोणी लिहिल्या नसतील, तर त्यांचे व इतर ईश्वरभक्तांचे उदाहरण घेऊन व धैर्य धरून मीही ईश्वरसहाय्याने व नम्रतेने हा प्रयत्न केला आहे.` ईश्वरसेवा, स्वमत समर्थन यासोबतच मनात आलेले धर्मविषयक विचार लोकांच्या आत्मिक कल्याणासाठी प्रसिध्द करावेत, या बाबांच्या आत्मनिवेदनपर लेखनामागील प्रेरणा होत्या.

<u>बाबांची साहित्यनिर्मिती : धर्मांतरापूर्वीची</u>

देशी भाषांमधून लेखन करणा-यांना उत्तेजन देण्याच्या सरकारी धोरणाचा, तसेच विविध सार्वजनिक संस्थांमार्फत दिल्या जाणा-या उत्तेजनाचा फायदा घेऊन प्रारंभीच्या काळात बाबांनी आपली लेखनविषयक हौस पुरविलेली दिसते. या काळात शिक्षितांचे प्रमाण अत्यल्प होते. जे शिकत असत, त्यांना आपल्या चिंतनाच्या प्रसारासाठी ग्रंथलेखनाची गरज वाटे. त्यामुळे तत्कालीन समाजधारणेत ग्रंथनिर्मितीला कालसापेक्ष असे नवे महत्व प्राप्त झाले होते. बाबांचे धर्मांतरापूर्वीचे ग्रंथलेखन असेच विचार प्रतिपादनाच्या गरजेतून निर्माण

झाले आहे.

विद्यार्थीदशेत बाबा जे वाचीत, त्यावर जे मनन करीत, सभोवताली जे अवलोकन करीत ते सारे प्रकट करण्यासाठी त्यांनी काही स्फुटलेखन केले. त्या लेखांचे संकलन ' सर्वसंग्रही ' या नावाने सिध्द केले. त्यात त्यांनी अनेक ऐहिक, पारमार्थिक गोष्टींचा परामर्श घेतला आहे. जिज्ञासा, त्यातून निर्माण झालेला वाचनाचा व्यासंग, जे वाचले ते इतरांना सांगण्याची धडपड इ. प्रेरणा मधून हे लेखन त्यांनी केले आहे. याचकाळात बाबा ' ज्ञानोदया ' तही स्फुटलेखन करीत. कृष्णशास्त्री साठे यांच्या ठाकुरद्वारात झालेल्या व्याख्यानाचे सारांश बाबांच्या टीका-टिप्पणीसह ' ज्ञानोदया ' त ( १८५२,५३ ) प्रसिध्द झाले आहेत. त्यांचा कानोसा घेतल्यास त्यांची ख्रिस्ती धर्मावरील श्रध्दा पदोपदी जाणवते. आणि अप्रकटपणे बाबा ख्रिस्ती धर्मात पोहोचलेले होते असे वाटते.

मेडिकल कॉलेजला रामराम ठोकून पुन्हा फ्रीचर्च विद्यालयात प्रवेश करणाऱ्या बाबांनी ' हिंदू लोकांच्या सणांविषयी निबंधा ' चे लेखन ट्रॅक्ट सोसायटीच्या आवाहनानुसार [१०] केले होते. पुढे ' स्त्रीविद्याभ्यास निबंधा ' तून त्यांनी स्त्रीशिक्षणाची गरज मांडली. ' व्यभिचार निषेधक बोध ' हे त्यांचे पुस्तक सामाजिक नीतिमत्तेविषयी चर्चा करणारे आहे.

याकाळात बाबा हिंदू धर्मात असले तरी त्यांच्या लेखनावरील ख्रिस्ती धर्माची छाप जाणवते. म्हणूनच बाबा हिंदू धर्मातील वैगुण्यांवर ख्रिस्ती दृष्टीकोणातून घसरताना दिसतात. लोकहितवादी यांनीही हिंदू धर्मातील वैगुण्यांवर टीका केली आहे. ती क्वचित प्रसंगी एकांगी, शिवराळ व विध्वंसक झाली आहे. तरी त्यांच्या मनात स्वधर्मातील मूलतत्वांबद्दल आस्था आहे. सध:स्थितीत हिंदू धर्माला आलेल्या विकृत स्वरूपाबद्दल लोकहितवादींचा आक्षेप आहे. परंतु ख्रिस्ती धर्मस्वीकाराकडे डोळे लावलेले बाबा ज्यावेळी स्वधर्मावर टीका करतात, तेव्हा ती कृत्रिम व एका परक्याची वाटते. बाबांनी बायबल व इतर ख्रिस्ती धर्ममतांवर श्रध्दा

ठेवून हे लेखन केले आहे, याला `ज्ञानप्रकाश` कारांनी दुजोरा दिला आहे.[११] `त्याने स्त्रीविद्याभ्यास निबंध, सणांविषयी निबंध, व्यभिचार निषेधक बोध, आदीकरून पुस्तके मराठीत केली आहेत. त्यात बैबलातील वाक्ये घेतली आहेत. श्रुतिस्मृतीसारखी गौरवून लिहिली आहेत, त्यावरूनच त्याची श्रध्दा त्या धर्मावर आहे हे स्पष्ट दिसते.` या काळातील त्यांच्या विचारांवर ख्रिस्ती धर्ममतांची किती दाट छाया होती हे त्यांनी `परमहंस मंडळी` च्या एका बैठकीत वाचलेल्या `उध्दवाने गोपींस शिकविलेले ब्रम्हज्ञान` या निबंधातील भूमिकेवरूनही स्पष्टपणे जाणवते.

धर्मांतरापूर्वीची बाबांची एकूणच वृत्ति ख्रिस्तानुकूल असली तरी बाबांच्या लेखनाविष्कारातील त्यांच्या समाजशिक्षकाच्या भूमिकेचेही भान ठेवणे आवश्यक आहे. समता, मानवता या मूल्यांचा परिचय स्वसमाजाला करून द्यावा ही तळमळ त्यांना होती. तसेच स्वबांधवांना साक्षर करावे. त्यांना व्यसनाचे दुष्परिणाम सांगावेत, विवाह संस्थेतील त्रुटी दूर कराव्यात हे हेतूही त्यांच्या लेखनामागे होते. एके ठिकाणी [१२] इतर लेखकांशी स्वत:ची तुलना करताना बाबांनी आपल्या लेखनामागील लोककल्याणाच्या भावनेचा स्पष्ट उल्लेख केला आहे. बाबा म्हणतात, `जशी त्या ग्रंथकर्त्यांनी लोकांचे कल्याण करण्याची वास्तविक इच्छा धरून श्रम केले, तसेच मी स्वजन हित कल्पून हा प्रयत्न केला आहे तो सर्व सूज्ञांनी मान्य करावा.`

सारांश, बाबांच्या धर्मांतरापूर्वीच्या लेखनात, त्यांनी मनाच्या एका कोपऱ्यात जपलेल्या ख्रिस्ती धर्मश्रध्देची छाया जाणवत असली तरी त्यामधून त्यांची सामाजिक प्रश्नांबद्दलची तळमळही जाणवते.

बाबांची साहित्यनिर्मिती : धर्मांतरानंतरची

धर्मांतरानंतर मात्र बाबांनी आपली लेखणी अव्याहतपणे ख्रिस्ती

धर्मप्रसार, या एकाच हेतूसाठी चालविलेली आहे. `कुटुंबाची सुधारणा` या निबंधातून बाबांनी `संसार असार आहे` हे हिंदूचे पारंपारिक मत खोडून काढले आहे. संसारात गोडी घेऊन राहाणे कसे योग्य आहे, त्याच्या स्पष्टीकरणावर ख्रिस्ती तत्वज्ञानाच्या प्रचाराचा पगडा आहे. धर्मप्रसाराच्या श्रध्देमधून `ख्रिस्ती धर्म व हिंदू धर्म यांची तुलना`, `हिंदू धर्माचे स्वरूप`, `कृष्ण व ख्रिस्त यांची तुलना` अशी कित्येक पुस्तके निर्माण झाली आहेत. विधवा पुनर्विवाहासारख्या त्यक काळाच्या ज्वलंत सामाजिक समस्येचे उत्तर त्यांनी `यमुनापर्यटना` द्वारे धर्मांतरातच शोधले आहे. त्यामुळे त्यातील समस्येचे स्वरूप बदलून गेले आहे, तीव्रताही कमी झाली आहे. ख्रिस्ती झाल्यानंतर आध्यात्मिक मनोविकास दर्शनासाठीच त्यांनी आत्मनिवेदनपर लेखनाचा आश्रय आहे.

ख्रिस्ती धर्माबद्दलच्या उत्कट आस्थेतूनच त्यांचे वाचन, लेखन चालत होते. वयाच्या पासष्टाव्या वर्षी त्यांनी आपल्या स्वीकृत कार्याबद्दल प्रकट केलेले विचार त्यांच्या मनोभूमिकेवर प्रकाश टाकण्यास समर्थ आहेत. मला आणखी आयुष्य लाभले तर अधिक उत्कटतेने मी प्रभू येशूची सेवा करीन असे ते म्हणतात.[१३] घेतलेले व्रत आचरिण्यात मी असमर्थ ठरलो ही बाबांची कबुली ही अंगिकृत कार्याबद्दलची उत्कट आस्थाच प्रकट करते. या आस्थेनेच त्यांच्या धर्मांतरानंतरच्या साहित्यसेवेला अगदी व्यापून टाकले आहे. बाबांची धर्मांतरानंतरची साहित्यसेवा म्हणजे एका अर्थाने ख्रिस्तसेवाच आहे.

## समकालीन ख्रिस्ती वाङ्मय आणि बाबांचे लेखन

स्वधर्माची बीजे रोवणाऱ्या ख्रिस्तानुयायांच्या ठायी समर्पणाची भावना, धर्मप्रसारासाठी आवश्यक असणारी श्रध्दावृत्ती आणि प्रभू येशूचा संदेश सर्व थरात पोहोचविण्यासाठी लागणारी प्रयत्नांची पराकाष्ठा होती. त्यांच्या या प्रयत्नांमधून ख्रिस्ती मराठी वाङ्मय निर्माण झाले.

महाराष्ट्रात इंग्रजी अंमल सुरू होण्यापूर्वीच ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी इ.स.१८१३ मध्ये मुंबईत `अमेरिकन मराठी मिशन` ची मुहूर्तमेढ रोविली होती. या संस्थेने अशा वाङ्.मयनिर्मितीस मोठाच हातभार लावला. मिसेस फेरार यांनी `कुटुंब प्रवर्तन नीति` सारखे सामाजिक स्वरूपाचे जसे लेखन केले तसेच मनोरंजक गोष्टींच्या आधारे ख्रिस्ती धर्माची महती सांगणारे लेखनही केले. रे. रामकृष्णपंत मोडक यांनी `ज्ञानोदया`तील वेचे एकत्र करून मुलांसाठी वाचन पाठावली तयार केली. रे. नारायण शेषाद्री कृत `खरा पश्चाताप`, `फुलमुनि आणि करूणा` ही पुस्तकेही लक्ष वेधून घेतात. ख्रिस्ती वाङ्.मयाच्या या पसाऱ्यात बाबांच्या लेखनाचे काही वेगळेपण आहे काय ? याचाही विचार करणे गरजेचे आहे.

धार्मिक प्रेरणेने जीवन जगणे आज कुणाला गैर वाटेल परंतु धर्मावर श्रध्दा ठेवून जगणारी माणसे असतात. बाबा त्यापैकीच एक होते. याच धर्मविषयक श्रध्देतून त्यांनी सातत्याने आयुष्यभर लेखन केलेले आहे. ट्रॅक्ट सोसायटीचा अर्धाअधिक ग्रंथसंग्रह बाबांच्या हातचा आहे. समकालीन ख्रिस्ती लेखकांपेक्षा बाबांच्या ग्रंथांचे संख्याबाहुल्य प्रथमदर्शनीच जाणवते. यापेक्षा वेगळेपण त्यांच्या लेखनाच्या अंतरंगात निश्चित आहे. त्यांच्या प्रतिभेने नित्य नव्या वाटा चोखाळल्या आहेत. निबंध, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र इ.वाङ्.मयप्रकार त्यांनी हाताळले. धर्म संस्काराच्या हेतूमधून नियतकालिके चालविली. कोशरचनेसारख्या कार्याला हात घालणारे बाबा हे अपवादभूत ख्रिस्त सेवक आहेत. त्यांच्या या साऱ्या उद्योगाकडे पाहिले असता वाटते की बाबांमधील कलावंत त्यांच्यातील प्रचारकाला पूरक ठरत होता. विपुलता आणि विविधता ही बाबांच्या लेखनाची वैशिष्ट्ये समकालीन ख्रिस्ती लेखकात आढळत नाहीत. त्यामुळे बाबा हे आधुनिक मराठी ख्रिस्ती वाङ्.मयाचे जनक ठरतात.

बाबांनी आपल्या निष्ठा ख्रिस्ती धर्माला अनन्यभावाने अर्पण केल्या होत्या तरी ते लोककल्याण व स्वदेशाभिमानाला पारखे झाले नव्हते.[१४]

त्यांच्या या भूमिकेच्या परिणामुळे इतर ख्रिस्ती लेखकांच्या वाङ्मयाला नसलेले मोल त्यांच्या लेखनाला लाभले आहे.

एकोणिसाव्या शतकातील मराठी साहित्य आणि बाबांचे लेखन

या काळात ज्याला जे जमेल असे वाटले, त्याने ते लेखनिविष्ट करण्याचा प्रयत्न चालविला होता. संस्कृत, इंग्रजीतून मराठीत आणून सोडण्याचा प्रयत्न चालविला होता. आशयाचे अनुकरण, रूपांतर अशा स्वरूपाचे हे प्रयत्न होते. त्यामुळे अर्वाचीन मराठी वाङ्मय हे मराठी वाङ्मयावर इंग्रजी वाङ्मयाचे कलम झाल्यामुळे आलेले फळ आहे असे म्हटले जाते. पण कलम करण्याचे फायदे असे की, प्राप्त झालेले फळ वेगळ्या स्वरूपाचे, अधिक रसस व भरदार असते. ते अल्पावधीत मिळते, तसे ते मराठी वाङ्मयाच्या बाबतीतही घडले.[१५]

अनेकांनी अनेक प्रकारे मराठी भाषेला समृध्द करण्याचा प्रयत्न चालविला होता. कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी `अर्थशास्त्र परिभाषा` सारखे ग्रंथ लिहिले. हरि केशवजींनी `रसायनशास्त्र,` `पदार्थविज्ञान` विषायक संवाद लिहिले. बाळशास्त्री जांभेकरांनी गणित, ज्योतिष, व्याकरण - शब्दसिध्दी इ. विषयांवर पुस्तके लिहिली. या सामाजिक प्रबोधनाच्या युगात वाङ्मयीन भूमिकेतून लिहिलेली पुस्तके मात्र अपवादभूत आहेत. सामाजिक सुधारणा, राजकीय मतप्रतिपादन, विज्ञानाचा परिचय, नीतिबोध, भाषामीमांसा, व्याकरण, कोश, ऐतिहासिक माहिती, धर्मचर्चा या हेतूमधून बरेचसे ग्रंथलेखन झाले.

या काळातील विचारप्रवाह आणि त्यांचा लेखनाविष्कारावर झालेला परिणाम याबाबत विचार करताना सनातनी आणि सुधारक यांच्यातील विचार संघर्षाचा उल्लेख करणे आवश्यक आहे. जुनी विद्या आणि नवे शिक्षण, जातिभेद आणि सामाजिक उच्चनीचता, व्यक्तिस्वातंत्र्य व समाजाची सत्ता, स्वधर्मातील कर्मकांडाचे अवडंबर आणि ख्रिस्ती धर्मातील मानवता, सेवाभाव

यामधून खूप विचारमंथन झाले. या विचारसंघर्षातील नवविचारांचे प्रतिनिधित्व करणारे लोकहितवादी हे एक होते. स्वत:ला पटलेल्या विचारमार्गाचे सर्वांना दर्शन व्हावे याच हेतूने ते सातत्याने लिहित होते. भाषेकडे ते विचार प्रकटीकरणाचे साधन म्हणून पाहात होते. लोकहितवादींच्याजवळ भाऊ महाजनांची विनोददृष्टी असती तर त्यांनी आपल्या ओबडधोबड अभिव्यक्तीला वक्रोक्तीचे रूप दिले असते. विनोदाला वाङ्‌मयातील अहिंसा म्हटले जाते. या वाङ्‌मयातील अहिंसेचा स्वीकार न करिता सरळ घाव घालण्याचे तंत्र त्यांनी अवलंबिले होते. जोतीराव फुल्यांनी हेच केले. बाबांची अभिव्यक्ति पध्दती या दोघांशी साम्य राखणारी असली तरी ती काहीशी सभ्य व सौम्य वाटते, परंतु तो त्यांच्या स्वभावाचा एक विशेष आहे.[१६]

एकोणिसाव्या शतकातील मोठ्या ग्रंथकारांमध्ये बाबांची गणना होत असली तरी या साऱ्या ग्रंथकारांमध्ये ते अनेक दृष्टींनी वेगळे पडतात. एक म्हणजे बाबांसारखा दीर्घोद्योगी लेखक त्या काळात विरळाच मानावा लागेल. युरोपियन ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या सहवासाने लेखन व मुद्रण याबाबतीत ते अतिशय सापेक्षी होते. त्यांच्या लेखनातील शिस्त, पुस्तकांच्या प्रसिध्दीपूर्व जाहिराती देऊन त्यांचा खप वाढविण्याची त्यांनी रूढ केलेली प्रथा, वाचकांच्या सोयीसाठी ग्रंथाच्या अखेरी सूचि, दर्शिका देण्याचा त्यांनी पाडलेला पायंडा, मुद्याच्या विवेचनासाठी संदर्भ व तळटीपा देण्याची त्यांची वृत्ती, नियतकालिकातून वर्षअखेरी वर्षभराच्या घटना देऊन लोकांची बहुश्रुतता वाढविण्याचा त्यांनी पाडलेला पायंडा, कोशरचनेत तांत्रिक वा तात्त्विक अंगांना महत्त्व देण्याऐवजी त्याची लोकाभिमुखता वाढविण्यासाठी त्यांनी केलेले दीर्घ परिश्रम - ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये, त्यांच्या प्रेरणा, आविष्काराची बाह्यांगे त्या काळाच्या लेखनाच्या तुलनेत दुर्मिळ व अभिनव आहेत.

बाबांनी धर्मप्रसाराच्या निमित्ताने का होईना पण मातृभाषेची आमरण सेवा केली. शब्दकोशांची रचना, कादंबरी लेखन, निबंध लेखन,

नियतकालिकांचे संपादन, पाठ्यपुस्तकांची निर्मिती, आत्मपर लेखन हे त्यांच्या लेखनकर्तृत्वाचे पैलू अवलोकिल्यास त्यांच्या आश्चर्यकारक प्रतिभेची, दीर्घ व्यासंगाची, दांडग्या उद्यमशीलतेची, सर्वगामी कल्पकतेची साक्ष पटते. बाबांकडून भाषेच्या, साहित्याच्या विविध कक्षांना स्पर्शणारे लेखन झाले आहे. बाबांच्या लेखनात वैचारिक तपशिलाप्रमाणे अंत:करणाचा जिव्हाळा आहे. त्यांनी मराठी गद्यामधील सुबोधता सफल केली. तसेच त्यांच्या वैचारिक निष्ठेमुळे लेखनात मार्दवपणा व चिंतनाचे तेज प्रकटले आहे.

परंतु राज्यकर्त्यांचा धर्म स्वीकारल्यामुळे त्यांना स्वसमाजाच्या वास्तव अवस्थेचे आकलन झाले नाही. ख्रिस्ती धर्मानुरोधाने होणाऱ्या आत्मिक विकासापुढे ऐहिक अभिवृध्दीची नवी धारणाही त्यांना दुबळेपणाची वाटली. यामुळे बाबांचे लेखन - त्या काळाचे, त्यामधील समस्यांचे, समाजमनाच्या आकांक्षांचे यथोचित समीक्षण करण्याच्यादृष्टीने अपुरे आहे. ख्रिस्ती धर्मप्रणित जीवनमार्ग, हेच सर्व प्रश्नांचे उत्तर आहे, ही त्यांची एकांतिक श्रध्दा त्यांच्या विचार-प्रतिपादनातील समतोल ढळविण्यास कारणीभूत झाली आहे. इंग्रजांची व्यक्तिगत नीतिमत्ता व त्यांची सामाजिक शिस्त आत्मसात करणे ही काळाजी गरज आहे याबद्दल अनेकांचे एकमत झाले होते. परंतु देशबांधवांना ख्रिस्ती धर्माच्या स्वीकारामुळेच खऱ्या नीतीची ओळख होईल ही बाबांची धारणा एकांगी, अप्रस्तुत होती.

ख्रिस्ती धर्मश्रध्दा ही त्यांची केवळ लेखन प्रेरणाच नव्हे तर जीवन प्रेरणाच होती. बाबांच्या व्यक्तिमत्वाचे हे आकलन झाल्यानंतरच त्यांच्या साहित्यनिर्मितीचे आकलन होईल. आध्यात्मिक अर्थाने बाबा स्वत: जागे झाले होते आणि इतरांनाही जागे करण्याचा प्रयत्न करीत होते, त्यासाठी त्यांनी प्रबोधनाचे व्रत स्वीकारलेले होते. मात्र हे प्रबोधन ख्रिस्ती धर्मप्रचाराच्या उत्कट श्रध्देमधून जन्मले होते. या प्रबोधनासाठी त्यांनी अव्याहत लेखन केले. या वस्तु-स्थितीचे भान राखून बाबा पदमनजींच्या साहित्य निर्मितीकडे पाहावे लागेल.

## संदर्भ - सूचि


१. काही पुस्तके म्हणजे - हिंदू लोकांच्या सणांविषयी निबंध, स्त्रीविद्याभ्यास निबंध, व्यभिचार निषेधक बोध.

२. ज्ञानोदय, १५ एप्रिल, १८५९, पृष्ठ ११२

३. जोग, रा.श्री. - मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड -४ (१८०० ते १८७४) महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांचे प्रकाशन आवृत्ति पहिली १९६५, पृष्ठ ६

४. रानडे, गो.मो. - महाराष्ट्रातील समाजविचार सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे-नागपूर आवृत्ति पहिली १९७१, पृष्ठ १५८, १५९

५. कुलकर्णी, द.भि. - निबंध वाङ्मय, मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड-४ (१८०० ते १८७४) संपा. रा.श्री. जोग महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांचे प्रकाशन आवृत्ति पहिली १९७१, पृष्ठ ४३९

६. कऱ्हाडकर, डॉ. के.सी. - बाबा पद्मनजी: काल व कर्तृत्व महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई आवृत्ति पहिली १९७९, पृष्ठ ५३

७. भिंगारे, डॉ. ल.म. - 'कथा - कादंबरी,' मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड-४ महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांचे प्रकाशन आवृत्ति पहिली १९७१, पृष्ठ २१३

८. कुरूंदकर, नरहर - धार आणि काठ देशमुख आणि कंपनी, पुणे आवृत्ति पहिली १९७१, पृष्ठ १६

९. बाबा पदमनजी - अनुभवसंग्रह भाग १ व २
व्हिक्टोरिया प्रिंटिंग प्रेस, मुंबई, १८९५, पृष्ठ २

१०. ज्ञानोदय, ९ मे १८५२, पृष्ठ १३०

११. ज्ञानप्रकाश मधील हे वृत्त ज्ञानोदयाने उद्धृत केले आहे.
ज्ञानोदय, १३ सप्टेंबर, १८५४, पृष्ठ २८७

१२. बाबा पदमनजी - व्यभिचार निषेधक बोध, प्रस्तावना
स्वत: छापून प्रसिध्द केले १८५४

१३. बाबा पदमनजी - अनुभवसंग्रह भाग १ व २
व्हिक्टोरिया प्रिंटिंग प्रेस, मुंबई, १८९५, पृष्ठ ६

१४. बाबा पदमनजी - अरूणोदय
बॉंबे ट्रॅक्ट ॲण्ड सोसायटी, मुंबई
द्वितियावृत्तीचे पुनर्मुद्रण ऑगस्ट १९५५, पृष्ठ २०९

१५. जोग उनि, पृष्ठ ३

१६. जोग, रा.श्री. - मराठी वाङ्मयाभिरूचीचे विहंगमावलोकन
व्हीनस प्रकाशन, पुणे
आवृत्ती दुसरी जानेवारी १९७६, पृष्ठ २००


---000---